# कार्यावली

## सोमवार, दिनांक ९ मार्च, २०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता मुंबई येथील विधान भवनात सुरु होणाऱ्या महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१५ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनाची कार्यावली.

**एक** : राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत सभागृहासमोर ठेवणे.

**दोन** : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव.

**तीन** : सभापतींनी, सभापती-तालिका नामनिर्देशित करणे.

**चार** : प्रश्नोत्तरे.

**पाच** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.

**सहा** : राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा.

**सात** : सन २०१५-२०१६ च्या अर्थसंकल्प सादर करणे

**आठ** : सन २०१५-२०१६ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

**नऊ** : सन २०१४-२०१५ च्या पुरवणी मागण्या सादर करणे.

**दहा** : सन २०१४-२०१५ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा.

**अकरा** : विधानपरिषद आश्वासन समितीचे अहवाल सादर करणे.

**बारा** : मंत्र्यांनी कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

**तेरा** : शासकीय विधयके.

**चौदा** : इतर शासकीय कामकाज ज्याची सूचना नंतर देण्यात येईल.

**पंधरा** : शोक प्रस्ताव.

**सोळा** : इतर प्रस्ताव.

**सतरा** : तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर अल्पकालीन चर्चा- म.वि.प.नियम ९७ अन्वये.

**अठरा** : तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे मंत्र्यांचे लक्ष वेधणे - म.वि.प.नियम १०१ अन्वये.

**एकोणीस** : **अशासकीय विधेयके - विचारार्थ -**

(१) सन २०११ चे वि.प.वि. क्रमांक ९ - महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (सुधारणा) विधेयक, २०११ - श्री. विजय सावंत, वि.प.स. यांचे.

(२) सन २०१२ चे वि.प.वि.क्रमांक २ - महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन (सुधारणा) विधेयक, २०१२ - श्री. रामनाथ मोते, वि.प.स. यांचे.

(३) सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक ६ - महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन (सुधारणा) विधेयक, २०१३ -श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांचे.

(४) सन २०१३ चे वि.प.वि.क्रमांक ११ - बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१३ - श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांचे

(५) सन २०१४ चे वि.प.वि.क्रमांक २ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०१४ - श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. यांचे

(६) सन २०१४ चे वि.प.वि.क्रमांक ३ - महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) (सुधारणा) विधेयक, २०१४ -श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. यांचे

(७) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक ११ - मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०१४ - श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.

(८) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक १२ - महाराष्ट्र स्त्रियांची छेडछाड करण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, २०१४ - श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.

(९) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक १३ - बियाणे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१४ - श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.

(१०) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक १४ - महाराष्ट्र शेतकरी, कारागीर व भूमिहीन मजूर यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत विधेयक, २०१४ - श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.

(११) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक १५ - कारागृहे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१४ - श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.

(१२) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक १६ - महाराष्ट्र बेकारी निर्मूलन विधेयक, २०१४ - श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.

(१३) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक १७ - मुंबई दारुबंदी (सुधारणा) विधेयक, २०१४ - श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.

(१४) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक १८ - हिंदू अज्ञानत्व व पालकत्व (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१४ - श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.

(१५) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक १९ - महाराष्ट्र हिंसाचार व लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती व जाहिरात-फलक लावण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, २०१४- श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.

(१६) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक २० - भ्रष्टाचार प्रतिबंध (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१४ - श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.

(१७) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक २१ - महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) (सुधारणा) विधेयक, २०१४ - श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.

(१८) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक २२ - फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१४ - श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.

(१९) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक २३ - बाल कामगार (प्रतिबंध आणि विनियमन) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१४ - श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.

**वीस : अशासकीय ठराव (म.वि.प. नियम १०२).**

**ॲड. निरंजन डावखरे यांचे ठराव क्रमांक १,२,३ व ४**

(१) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण, नोकरी व रोजगाराअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य, शासनाने बंद केलेला सुशिक्षित बेरोजगार भत्ता, रोजगाराच्या भाग भांडवलासाठी बँकासारख्या आर्थिक संस्थाकडून येणाऱ्या अडचणी, या बाबी विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या सोडविण्यासाठी व गरीब कुटूंबातील व्यक्तीला रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी व सुशिक्षित बेरोजगारांना पुन्हा भत्ता सुरू करावा, रोजगारासाठी भागभांडवलाची सोय करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२) '' राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्याच्या तुलनेत या राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्यायावत व योग्य पध्दतीने पूर्वतयारी करुन घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हयात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याचे दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३) '' ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विद्यार्थी संख्या व शैक्षणिक कामांसाठी वारंवार मुंबईला मारावे लागणारे हेलपाटे तसेच त्या भागातील आदिवासी लोकसंख्या, डोंगराळ व दुर्गम भाग विचारात घेता कोकण प्रदेशासाठी एक स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४) '' भारतीय संविधानाचे अनुच्छेद ३७१(२) अन्वये राज्यातील मराठवाडा, विदर्भ व उर्वरित महाराष्ट्रासाठी यापूर्वी स्थापन करण्यात आलेल्या वैधानिक विकास मंडळाच्या धर्तीवर "कोकण प्रदेशासाठी स्वतंत्र वैधनिक विकास मंडळ" स्थापन करण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.हेमंत टकले यांचे ठराव क्रमांक ५,६,७,८ व ९**

(५) '' राज्यातील दूरदर्शन तसेच केबल नेटवर्कद्वारा प्रसारित होणाऱ्या विविध चॅनेलद्वारा अश्लील व हिंसाचारी चित्रपट, जाहिराती व विविध विषयांवरील मालिका सर्रासपणे प्रसारित केल्या जातात, परिणामी तरुणपिढीवर व बालमनावर त्यांचे होणारे दुष्परिणाम व वाढते लैंगिक गुन्हे लक्षात घेता या सर्व वाहिन्यांवरील अश्लील कार्यक्रमांवर बंदी घालावी यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तात्काळ पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६) '' राज्यातील बहुसंख्य गावात विशेषतः उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणी टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७) '' राज्यातील शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(८) '' राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवास करुन अध्ययनाचे काम करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारिरिक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने ह्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(९) '' राज्यातील धार्मिक स्थळांच्या व तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांची होणारी अफाट गर्दी, परंतु धार्मिक स्थळी व तिर्थक्षेत्राकडे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना स्थानिक प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य प्राथमिक सोयी सुविधाही उपलब्ध करुन दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्या वेळी चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांना मृत्यू येणे, तसेच अनेक जण गंभीर जखमी होणे, या घटना क्लेशदायक असल्याने आता यापुढे राज्यातील धार्मिक स्थळांच्या, तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी शासनाने योग्य सुविधांचे नियोजन करण्याची नितांत आवश्यकता विचारात घेवून योजना आखाव्यात व त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनाला करीत आहे ''

**श्री.जयवंतराव जाधव यांचे ठराव क्रमांक १०,११,१२,१३ व १४**

(१०) '' महाराष्ट्र राज्यातील न्यायालयांमधील कामकाज इंग्रजी भाषेत केले जात आहे, मात्र राज्यातील न्यायालयांमधील कामकाज मराठी या मातृभाषेतून करण्यासाठी, मुंबई उच्च न्यायालयाची प्राधिकृत भाषा मराठी करण्यासाठी, भारतीय राज्यघटनेचे कलम ३४८(२) नुसार आवश्यक कार्यवाही करण्याकरिता राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. ''

(११) '' राज्याच्या सुवर्ण चतु:ष्कोनातील एक महत्वाचे शहर असल्याने नाशिक शहराला लागून असलेल्या ग्रामीण भागाचे झपाटयाने शहरीकरण होत आहे. त्यामुळे येथील पायाभूत सुविधांचा नियोजनबध्द विकास होण्यासाठी एमएमआरडीए मुंबई व नागपूर सुधार प्रन्यासच्या धर्तीवर "नाशिक क्षेत्र विकास प्राधिकरण" स्थापन करुन हया प्राधिकरणाला निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(१२) '' मुंबई विद्यापीठाचा "वीरमाता जिजाऊ मुंबई विद्यापीठ," सोलापूर विद्यापीठाचा "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ" तर उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा "बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ" असा नामविस्तार करण्याची राज्यातील जनतेची मागणी असल्यामुळे राज्य शासनाने मागणीप्रमाणे या विद्यापीठांचा नामविस्तार करण्याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. ''

(१३) '' बॉम्बे हायकोर्टाचे 'मुंबई उच्च न्यायालय' असे नामकरण करणे महाराष्ट्राच्या अस्मितेसाठी आवश्यक आहे. या बदलासाठी उच्च न्यायालयाच्या लेटर्स पेटंट ॲक्ट, १८६६ या केंद्रिय कायद्यामध्ये सुधारणा करावी लागणार आहे. तमाम महाराष्ट्रीयन बांधवांच्या भावनांचा विचार करून "बॉम्बे हायकोर्टाचे" "मुंबई उच्च न्यायालय" असे नामकरण करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाक्डे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१४) '' राज्यातील नगरपालिका व महानगरपालिका राज्य शासनाकडून मोठया प्रमाणात अनुदान मिळत असल्यामुळे त्यांच्या आर्थिक कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी पंचायत राज समितीच्या धर्तीवर विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.प्रकाश बिनसाळे यांचे ठराव क्रमांक १५,१६,१७ व १८**

(१५) '' मुंबईसह राज्यात सदनिकांच्या किंमती प्रचंड प्रमाणात वाढणे, सदरहू सदनिकांच्या किंमती मूळ किंमतीपेक्षा कितीतरी पट अधिक असल्याने सर्वसामान्य ग्राहक जनतेस सदनिका खरेदी करणे आवाक्याबाहेर जाणे, सर्वसामान्य जनतेला मोठे घर घेण्याची ऐपत नसल्यामुळे त्यांच्यासाठी लहान घरे बांधण्याची विकासकांवर सक्ती करण्याची आवश्यकता, सदनिकांचे वाढते दर नियंत्रित करुन स्थिर ठेवण्याची राज्यातील जनतेकडून होत असलेली मागणी, सदनिकांचे वाढते दर नियंत्रित ठेवण्यासाठी खाजगी बांधकाम व्यवसायिकांनी खरेदी केलेली जमिन आणि बांधकामाचा खर्च गृहीत धरुन एरियावाईज प्रति चौरस फूट याप्रमाणे शासनाने

घरांच्या किंमती जाहीर करुन व वाढते दर नियंत्रित करुन सर्वसामान्य जनतेला परवडतील अशा किंमतीत घर देण्याबाबत राज्य शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. ''

(१६) '' राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवास करुन अध्ययनाचे काम करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारिरिक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने ह्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(१७) '' कोकणातील विशेषत: रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग व ठाणे या चार जिल्हयांसाठी एक स्वतंत्र मत्स्य विद्यापीठ स्थापन करुन त्यात मत्स्यव्यवसायासंबंधी विविध अभ्यासक्रम अंतर्भूत करावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१८) '' राज्यात विशेषत: ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग या जिल्ह्यांच्या किनारपट्टीवरील अनेक गावांच्या संरक्षणासाठी हजारो किलोमीटर लांबीचे बांधण्यात आलेले धूप प्रतिबंधक बंधारे दरवर्षी अनेक वेळा फुटल्यामुळे समुद्राचे खारे पाणी शेतजमिनीत शिरुन शेतीच्या मालमत्तेचे, झाडांचे व शेतीचे सतत होणारे नुकसान, दिवसेंदिवस समुद्राच्या आक्रमणांची वाढती तीव्रता व परिणामी लोकांच्या मालमत्तेचे मोठया प्रमाणात होत असलेले नुकसान लक्षात घेता समुद्राच्या वाढत्या अतिक्रमणाचा गंभीर स्वरुपाचा धोका निर्माण होऊ नये यासाठी शासनाने या चारही जिल्ह्यांच्या गावांच्या संरक्षणासाठी नियोजनबध्द व कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.नरेंद्र पाटील यांचे ठराव क्रमांक १९ व २२**

(१९) '' राज्यात बऱ्याच ठिकाणी विशेष:त रायगड जिल्हयात जात पंचायतींनी जातीतील लोकांना जातीतून बहिष्कृत करण्याच्या घटना घडत आहेत. बहिष्कृत केलेल्या समाजाच्या लोकांना जात पंचायतीने बहिष्कृत केले असल्यास अशा लोकांना समाजातून वाळीत टाकण्यात येणे, त्यांना गावी कोणत्याही प्रकारचा व्यवहार करण्यास मज्जाव करून त्याचे जीवन नकोसे केले जाणे. जात पंचायतीविरूध्द पोलिस ठाण्यात तक्रारी केल्या असता कायदे सक्षम नसल्यामुळे त्यांचेविरुध्द कडक कारवाई करणे अशक्य होत आहे. आजच्या प्रगत समाजात अशा घटना पुन्हा घडू नये यासाठी कडक कायदे करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२२) '' राज्यात राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठया प्रमाणात होत असलेले अपघात, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालये नसणे, या अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी राज्यमार्ग, राष्ट्रीय महामार्ग येथे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान-लहान उपचार केंद्रे सुरु करणे, सदरची उपचार केंद्र सुरू झाल्यास येथे वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचारी नेमणूक केली गेली तर सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळून राज्यातील बेरोजगारी दूर होण्यास मदत होईल तसेच

अपघातग्रस्तांना वेळीच उपचार होतील. म्हणून राज्यमार्ग व राष्ट्रीय महामार्गावर ५० कि.मी. अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र उघडण्यात यावे, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.विक्रम काळे यांचे ठराव क्रमांक २३,२४,२५, २६ व २७**

(२३) '' केंद्र सरकारने राज्यात मुख्य रस्त्यापासून खेडे गावांना जोडण्याकरिता पंतप्रधान ग्राम सडक योजना अंमलात आणलेली आहे. त्याच धर्तीवर राज्यात पांदण रस्ता दुरुस्ती व मुख्यमंत्री सडक योजना राज्य शासनाने सुरु कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२४) '' राज्यातील मराठवाडा व विदर्भ तुलनात्मक दृष्टया मागासलेले विभाग असल्याने त्यांच्या विकासाच्या दृष्टीने परळी-बीड-नगर, नांदेड-किनवट-यवतमाळ-नागपूर, सोलापूर-उस्मानाबाद-बीड-औरंगाबाद-जळगांव या नवीन रेल्वे मार्गाच्या कामाचा सर्व्हे करुन त्वरित मंजूर करुन घेण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२५) '' शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा वा महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत दिली जाते त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील पाल्यांना शाळा वा महाविद्यालयांमार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत देण्यांत यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२६) '' राज्यात सातत्याने वाढणारी लोकसंख्या त्याचप्रमाणात वाढणारी वाहनांची संख्या, होणारे दररोजचे अपघात, त्यामुळे होणारी जिवितहानी टाळण्यासाठी राज्यातील सर्व राष्ट्रीय व राज्यमार्ग तसेच जिल्ह्या-जिल्ह्याला जोडणारे रस्ते हे चौपदरी करावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२७) '' राज्यातील ग्रामीण भागातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची संख्या वाढविण्यापेक्षा उपलब्ध असलेल्या शाळांमधून गुणात्मक व दर्जेदार शिक्षण विद्यार्थ्यांना मिळण्यासाठी ठोस कृती कार्यक्रम आखून त्याची कालबध्द अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.दिपकराव साळुंखे-पाटील यांचे ठराव क्रमांक २८,२९,३०,३१ व ३२**

(२८) '' राज्यातील सर्व शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी कर्जे ४ टक्के व्याजाच्या दराने पुरविण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२९) '' राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवास करुन अध्ययनाचे काम करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारिरिक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने ह्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(३०) '' राज्यातील सर्व माध्यमाच्या (इंग्रजी वगळून) प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधून व महाविद्यालयामधून उच्च प्रतीचे व गुणवत्तेचे शिक्षण विद्यार्थ्यांना मिळावे यासाठी त्या विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शाळांना व महाविद्यालयांना अनुदान देण्याचे धोरण शासनाने स्विकारावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३१) '' राज्यातील ग्रामीण भागातील जिल्हापरिषद शाळांची झालेली दयनीय अवस्था विचारात घेऊन शाळांसाठी कंपाऊंड वॉल, पाण्याची सुविधा, मुले व मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, वृक्षारोपण यासाठी महाराष्ट्र शासनाने जिल्हा परिषदांना आवश्यक तो विशेष निधी देण्याच्या दृष्टीने कारवाई करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३२) '' केंद्र सरकारने राज्यात मुख्य रस्त्यापासून खेडे गावांना जोडण्याकरिता पंतप्रधान ग्राम सडक योजना अंमलात आणलेली आहे. त्याच धर्तीवर राज्यात पांदण रस्ता दुरुस्ती व मुख्यमंत्री सडक योजना राज्य शासनाने सुरु कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.अनिल भोसले यांचे ठराव क्रमांक ३३,३४,३५,३६ व ३७**

(३३) '' राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणी टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी कमी करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३४) '' राज्यातील शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, अल्प प्रमाणातील महागडे मजूरवर्ग, सिंचनासाठीच्या पाणी दरामध्ये सतत होणारी वाढ, सवलतीच्या दरात शेतीपंपास वीजपुरवठा न मिळणे, जनावरांच्या तुलनेत शेतीकामात यंत्राचा वापर वाढल्याने शेती सामुग्रीतील अवाढव्य वाढ, नैसर्गिक व जैविक, शेती उत्पादन प्रयोगास पुरेसे संरक्षण विचारांत न घेणे, ह्या सर्व बाबीं विचारात घेता उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव ठरविण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३५) '' राज्यात राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठया प्रमाणात होत असलेले अपघात, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालये नसणे, या अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी राज्यमार्ग, राष्ट्रीय महामार्ग येथे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान-लहान उपचार केंद्रे सुरु झाल्यास येथे वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचारी नेमणूक केली गेली तर सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळून राज्यातील बेरोजगारी दूर होण्यास मदत होईल, तसेच अपघातग्रस्तांवर वेळीच उपचार होतील. म्हणून राज्यमार्ग व राष्ट्रीय महामार्गावर ५० कि.मी. अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र उघडण्यात यावे, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. ''

(३६) '' राज्यातील ग्रामीण भागातील जिल्हापरिषद शाळांची झालेली दयनीय अवस्था विचारात घेऊन शाळांसाठी कंपाऊंड वॉल, पाण्याची सुविधा, मुले व मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, वृक्षारोपण यासाठी महाराष्ट्र शासनाने जिल्हा परिषदांना आवश्यक तो विशेष निधी देण्याच्या दृष्टीने कारवाई करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३७) '' राज्यातील धार्मिक स्थळांच्या व तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांची होणारी अफाट गर्दी, परंतु धार्मिक स्थळी व तिर्थक्षेत्राकडे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना स्थानिक प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य प्राथमिक सोयी सुविधाही उपलब्ध करुन दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्या वेळी चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांना मृत्यू येणे, यामध्ये अनेक जण गंभीर जखमी होणे, त्यामुळे राज्यातील धार्मिक स्थळांच्या, तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी शासनाने योग्य सुविधांचे नियोजन करण्याच्या दृष्टीने तशा योजना आखाव्यात व त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनाला करीत आहे ''

**श्री.संदिप बाजोरिया यांचे ठराव क्रमांक ३८,३९,४०,४१ व ४२**

(३८) '' राज्यात अनेक ठिकाणी धरणासारख्या प्रकल्पांमध्ये ज्यांची घरे व जमिनी गेल्या आहेत, अशा प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाची कामे विनाविलंब व निश्चितपणे पूर्ण होतील या दृष्टीने कालबध्द कार्यक्रम आखण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३९) '' विदर्भातील हातमाग विणकरांच्या जटील बनत चाललेल्या विविध समस्या, तसेच त्यांची होत असलेली आर्थिक दुरावस्था व हलाखीचे जीवन, त्यात सुधारणा होण्याच्या दृष्टीने शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४०) '' नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असे असूनही पीक विमा नुकसान भरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे. याला शंभर वर्ष जुनी बिट्रीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करुन सुधारीत आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४१) '' राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवास करुन अध्ययनाचे काम करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारिरिक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने ह्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(४२) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगारांअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षांत घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नांवर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यांत यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.ख्वाजा बेग यांचे ठराव क्रमांक ४३,४४,४५,४६ व ४७**

(४३) '' राज्यातील समाजकल्याण, आदिवासी विकास विभाग आणि महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवास करुन अध्ययन करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारिरिक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने ह्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम तयार करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४४) '' विदर्भातील हातमाग, विणकरांच्या जटील बनत चाललेल्या विविध समस्या, तसेच त्यांची चाललेली आर्थिक दुरावस्था व हलाखीचे जीवन, त्यात सुधारणा होण्याच्या दृष्टीने शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४५) '' राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणी टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४६) '' राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवास करुन अध्ययनाचे काम करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारिरिक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने ह्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(४७) '' शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा वा महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत दिली जाते त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील पाल्यांना शाळा वा महाविद्यालयांमार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत देण्यांत यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्रीमती विद्या चव्हाण यांचे ठराव क्रमांक ४८,४९,५०,५१ व ५२**

(४८) '' मुंबईसह राज्यात मोठ्या प्रमाणात रस्त्यावर थुंकणे, कचरा टाकणे, अस्वच्छता ठेवणे असे प्रकार घडत असून यामुळे शासनाचा मोठ्या प्रमाणात खर्च याठिकाणी स्वच्छता राखण्यात होत आहे. अशाप्रकारच्या बेशिस्त वागण्यावर नियंत्रण आणण्यासाठी व लोकांमध्ये समाजाप्रती व देशाप्रती नैतिकता जागरुक करुन स्वत:च्या जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याकरीता शालेय शिक्षणापासून नागरिक शास्त्र हा विषय १०० गुणांसाठी करुन त्यांतून चांगला माणूस निर्माण करणारे शिक्षण देण्याचा कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. ''

(४९) '' राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणी टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५०) '' राज्यातील दूरदर्शन तसेच केबल नेटवर्कद्वारा प्रसारित होणाऱ्या विविध चॅनेलद्वारा अश्लील व हिंसाचारी चित्रपट, जाहिराती व विविध विषयांवरील मालिका सर्रासपणे प्रसारित केल्या जातात, परिणामी तरुण पिढीवर व बालमनावर त्यांचे होणारे दुष्परिणाम व वाढते लैंगिक गुन्हे लक्षात घेता या सर्व वाहिन्यांवरील अश्लील कार्यक्रमांवर बंदी घालावी यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तात्काळ पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५१) '' राज्यातील सर्व गावे बारमाही वाहतुकीस योग्य व्हावीत याकरिता सर्व ग्रामीण भागातील रस्त्यांची पाहणी करुन आवश्यक असेल तेथे नद्या, खाड्या नाले व मोऱ्या यांचेवर पूल बांधण्याची धडक योजना हाती घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५२) '' राज्यातील धार्मिक स्थळांच्या व तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांची होणारी अफाट गर्दी, परंतु धार्मिक स्थळी व तिर्थक्षेत्राकडे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना स्थानिक प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य प्राथमिक सोयी सुविधाही उपलब्ध करुन दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्या वेळी चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांना मृत्यू येणे, अनेक जण गंभीर जखमी होणे, या घटना क्लेशदायक असल्याने आता यापुढे राज्यातील धार्मिक स्थळांच्या, तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी शासनाने योग्य सुविधांचे नियोजन करण्याची नितांत आवश्यकता विचारात घेवून योजना आखाव्यात व त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनाला करीत आहे ''

**श्री.प्रकाश गजभिये यांचे ठराव क्रमांक ५४ व ५५**

(५४) '' महाराष्ट्र राज्यातील कायम विना अनुदान तत्वावरील २००१ पूर्वी मान्यता असलेल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सोयीसुविधांसाठी महाविद्यालयांना १०० टक्के अनुदान प्रदान करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५५) '' भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे "चैत्यभूमी" दादर, मुंबई येथे स्मारक आहे. तसेच डॉ.आंबेडकर यांचे वास्तव्य दादर येथे हिंदू कॉलनीत राजगृह येथे होते. तेथेच त्यांच्या वापरातील काही वस्तू जतन करुन ठेवण्यात आल्या आहेत. दिनांक १४ एप्रिल व ६ डिसेंबर या दिवशी या महामानवाला अभिवादन करण्यासाठी देशातील लाखो अनुयायी येत असतात. या महामानवाचे नाव चिरंतर स्मरणात रहावे यासाठी दादर रेल्वे स्थानकाला डॉ.बाबासाहेब आंबेडकर रेल्वे स्थानक असे नाव द्यावे अशी राज्यातील सर्व अनुयायी यांची फार पूर्वीपासून मागणी आहे. अत: दादर रेल्वेस्थानकाला "डॉ.बाबासाहेब आंबेडकर" रेल्वेस्थानक असे नाव द्यावे अशी आग्रही भूमिका केंद्र शासनाकडे राज्य शासनाने धरावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.सतीश चव्हाण यांचे ठराव क्रमांक ५८,५९,६०,६१ व ६२**

(५८) '' राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्याच्या तुलनेत या राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्यायावत व योग्य पध्दतीने पूर्वतयारी करुन घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हयात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याचे दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५९) '' राज्यातील खेळाडूंची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली पिछेहाट लक्षात घेता क्रीडा क्षेत्राचा सर्वांगीण विकास होण्याकरीता व दर्जेदार खेळाडू तयार करण्यासाठी तालुकास्तरावर क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत व त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत व अशा केंद्राना आवश्यक ते साहित्य पुरविण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६०) '' राज्यात दिवसेंदिवस वाढत चालेलली महागाई तसेच सेवायोजन कार्यालयात नाव नोंदणी करुनही सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीची संधी प्राप्त न होणे. सेवायोजन कार्यालयाकडून १९८५ पासून नोकरीसाठी मुलाखत पत्र न देणे, परिणामी बेरोजगारांना चरितार्थासाठी कोणतेही साधन उपलब्ध न झाल्याने चरितार्थ चालविणे जिकरीचे झाले आहे. म्हणून पदवी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढील ३ वर्षात नोकरी न मिळालेल्या बेरोजगारांना आर्थिक मदत म्हणून प्रतिमहा रुपये १५००/- बेकार भत्ता देण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे ''

(६१) '' राज्यातील ग्रामीण भागातील जिल्हापरिषद शाळांची झालेली दयनीय अवस्था विचारात घेऊन शाळांसाठी कंपाऊंड वॉल, पाण्याची सुविधा, मुले व मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, वृक्षारोपण यासाठी महाराष्ट्र शासनाने जिल्हा परिषदांना आवश्यक तो विशेष निधी देण्याच्या दृष्टीने कारवाई करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६२) '' केंद्र सरकारने राज्यात मुख्य रस्त्यापासून खेडे गावांना जोडण्याकरिता पंतप्रधान ग्राम सडक योजना अंमलात आणलेली आहे. त्याच धर्तीवर राज्यात पांदण रस्ता दुरुस्ती व मुख्यमंत्री सडक योजना राज्य शासनाने सुरु कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्रीमती शोभाताई फडणवीस यांचे ठराव क्रमांक ६४,६५ व ६६**

(६४) '' राज्यात विशेषत: विदर्भातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जागा मोठया प्रमाणात रिक्त असून त्यांत काही उद्योजकांनी जागा खरेदी करुन तेथे कोणताही उद्योग सुरू न करणे, नागपूर विभागात २६८७ उद्योग सुरू असून त्यातून केवळ ०.७१ हजार एवढाच रोजगार उपलब्ध होणे, अमरावती विभागात १५८९ उद्योग सुरू असून त्यातून केवळ ०.१९ हजार रोजगार उपलब्ध होणे, बुटीबोरी (नागपूर विभाग) या पंचतारांकित औद्योगिक वसाहतीत १९९९ पासून नवीन उद्योग येणे बंद होणे, तसेच बुटीबोरी येथील निवासी भूखंडाची एकूण ५३,५३६ चौ.मिटर जागेची अतिरिक्त मागणी एप्रिल २०११ ला प्रस्ताव पाठवून ही परवानगी न मिळणे, वर्धा एम.आय.डी.सी.तील ५० टक्के जागेत उद्योजकांनी जागा घेवूनही १० टक्के उद्योग अद्याप सुरू न होणे, ३ टक्के उद्योजकांनी केवळ निवासी बंगले बांधून जागेचा केलेला गैरव्यवहार, परिणामी बेरोजगारांना रोजगार मिळेल हा शासनाचा उद्देश सफल न होणे, या सर्व बाबींचा आढावा घेऊन यात कायमस्वरुपी ठोस उपाययोजना राबविण्यात यावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. ''

(६५) '' राज्यात औद्योगिक वसाहती व कारखान्यांचे वाढते प्रमाणे, त्यामुळे बहुतांश जिल्ह्यांत वायू प्रदुषण व जलप्रदुषणाची निर्माण झालेली समस्या, कोळसा खाणीपासून होत असलेले प्रदूषण, लहान मोठे उद्योजक त्यात थर्मक पॉवर स्टेशन, एम.आय.डी.सी.तील उद्योग, सिमेंट कारखाने, पेपर मिल, यापासून होत असलेले प्रदूषण, उद्योजक करारनामा करुन देखील नियम पाळत नसणे, विशेषत: ज्या भागात दुर्मिळ वनसंपदा तसेच वन्यजीवांचे वास्तव्य आहे त्या भागात कोळसा खाणीसाठी परवानगी देण्याचा चाललेला प्रकार, त्यामुळे वन व वन्यजीवांचे अस्तित्व धोक्यात येणे, त्यातच शासनाला अपुऱ्या साधन सामग्रीमुळे प्रदूषणावर आळा घालण्याकरिता शासनास येत असलेले अपयश, परिणामी जनतेच्या आरोग्याचा निर्माण झालेला प्रश्न, या सर्वांवर आळा घालण्याकरिता शासनाने विशेष यंत्रणा निर्माण करावी तसेच पर्यावरणाचा होणारा ऱ्हास लक्षात घेता आरक्षित वनांच्या ठिकाणी देण्यात आलेले कोलब्लॉक्स रद्द करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६६) '' राज्यात महिलांवरचे वाढते अत्याचार, सन २००९-१० मध्ये महिलांवरील अत्याचारात ५० टक्के झालेली वाढ, ३ वर्षे ते १० वर्षे वयाच्या अल्पवयीन मूलींवर बलात्कार व खून हयांत २००७-मध्ये २७ टक्के असलेले प्रमाण २००८ मध्ये १९.१९ टक्के वाढ झाली, १४ ते १८ वर्षे वयावरील बलात्कारात २००७ च्या तूलनेत १२.२१ टक्के वाढ होणे, महाराष्ट्राचे देशाच्या

अत्याचाराच्या तूलनेत चौथ्या क्रमांकावर असणे, त्यामुळे महिलांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होणे, राज्यातील पोलीस अत्याचार रोखण्यास असमर्थ असणे, हयावर शासनाने ठोस उपाय योजना व याला आळा घालण्याची शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे.''

**डॉ. अपूर्व हिरे यांचे ठराव क्रमांक ६८,६९,७०,७१ व ७२**

(६८) '' राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणी टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी कमी करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६९) '' राज्यात रस्ते अपघातात ताबडतोब व योग्य उपचार मिळत नसल्याने मृत्यू पावणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असणे, अपघातग्रस्तांना वेळीच योग्य उपचार मिळावेत म्हणून मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग, मुंबई- गोवा (वडखळ नाका) नाशिक शिर्डी, पुणे-कोल्हापूर, नाशिक-धुळे या सारख्या जास्त वाहनांची वर्दळ असलेल्या द्रुतगती मार्गांवर शासनाने ट्रॉमा केअर सेंटर सुरू करावेत, तसेच मुंबई-पुणे राष्ट्रीय मार्गावर चौक लोधिवली (ता.खालापूर, जि.रायगड) येथे अद्ययावत असलेल्या जे.एच.अंबानी हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय सेवा २४ तास देण्याची व्यवस्था करणे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७०) '' मराठी भाषेसाठी राज्य शासनाने स्वतंत्र विभाग स्थापन करण्याचा नुकताच घेतलेला निर्णय, सदर विभागासाठी १० कोटी रुपयांची तरतूद करुन स्वतंत्र सचिवांची नियुक्ती करण्याचा व त्यांच्या कक्षेत भाषा संचालनालय व इतर कार्यालये देण्याचा घेतलेला निर्णय, तरी राज्यातील ग्रामपंचायत स्तरापासून मंत्रालय स्तरापर्यंत आणि ग्रामपंचायत सदस्यांपासून मुख्यमंत्र्यांपर्यंत सर्व शासकीय निमशासकीय कार्यालयात तसेच राज्याच्या एकंदरीत सर्वच व्यवहारामध्ये मराठीचा १०० टक्के वापर होण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करणे, तसेच, कामकाजात मराठी भाषेचा वापर करण्यास टाळाटाळ करणाऱ्या अथवा त्यात कसूर करण्याऱ्या अधिकाऱ्यांना जबाबदार धरुन त्यांच्यावर कडक कारवाई करण्याची जबाबदारी देखील राज्य शासनाने मराठी भाषा विभागाकडे सोपविण्याचा निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७१) '' राज्यात पूर्व प्राथमिक शिक्षणासाठी सुमारे १ लाख अंगणवाडया आहेत. संख्या समाधानकारक जरी असली तरी या अंगणवाडयाद्वारे दर्जेदार पूर्व प्राथमिक शिक्षण मिळत नाही. वैद्यकीय शास्त्रानुसार लहान मुलांच्या मेंदूची ९० टक्के वाढ ही ६ वर्षापर्यंत होत असते. शैक्षणिक आवड निर्माण होणे, ज्ञानेद्रियांचा योग्य विकास होणे, तसेच बौध्दिक विकास या सर्व दृष्टीने हा कालावधी अत्यंत महत्वाचा आहे. यासाठी पूर्व प्राथमिक शाळेत दर्जेदार शिक्षण देण्यासाठी तज्ञांची समिती गठीत करून विशेष कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७२) '' वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात शासनातर्फे व महानगरपालिकांतर्फे रुग्णवाहिका सुरु न करणे, तसेच अपघात, नैसर्गिक आपत्ती किंवा आकस्मिक दुखणे, यामुळे सर्वसामान्य लोकांना रुग्णवाहिका सेवा तात्काळ उपलब्ध न होणे, त्यासाठी सामाजिक किंवा राजकीय संस्थांनी विभागा-विभागातून जनसेवेच्या उदात्त हेतूने रुग्णवाहिका सुरु केल्या आहेत, अशा रुग्णवाहिकांसाठी शासनातर्फे आर्थिक अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.किरण पावसकर यांचे ठराव क्रमांक ७३,७४,७५,७६ व ७७**

(७३) '' राज्यातील पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देवून त्याठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व त्यायोगे तेथील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यासाठी तसेच यासर्व पर्यटन स्थळांचे महत्व कायम राखण्याच्यादृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७४) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे व पदवीधरांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधीत प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७५) '' राज्यात राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठया प्रमाणात होत असलेले अपघात, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालये नसणे, या अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी राज्यमार्ग, राष्ट्रीय महामार्ग येथे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान-लहान उपचार केंद्रे सुरु करणे, सदरची उपचार केंद्रे सुरू झाल्यास येथे वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचारी नेमणूक केली गेली तर सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळून राज्यातील बेरोजगारी दूर होण्यास मदत होईल तसेच अपघातग्रस्तांना वेळीच उपचार होतील. म्हणून राज्यमार्ग व राष्ट्रीय महामार्गावर ५० कि.मी. अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र उघडण्यात यावे, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. ''

(७६) '' राज्यातील सर्व गावे बारमाही वाहतूकीस योग्य व्हावीत याकरिता सर्व ग्रामीण भागातील रस्त्यांची पाहणी करुन आवश्यक असेल तेथे नद्या, खाड्या नाले व मोऱ्या यांचेवर पूल बांधण्याची धडक योजना हाती घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७७) '' राज्यातील खेळाडूंची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली पिछेहाट लक्षात घेता क्रीडा क्षेत्राचा सर्वांगीण विकास होण्याकरीता व दर्जेदार खेळाडू तयार करण्यासाठी तालुकास्तरावर क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत व त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत व अशा केंद्राना आवश्यक ते साहित्य पुरविण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.सुनिल तटकरे यांचे ठराव क्रमांक ७८,७९,८०,८१ व ८२**

(७८) '' कोकणातील आंबा,काजू इ.पिकांचे नैसर्गिक आपत्तीमुळे फार मोठया प्रमाणात होणारे नुकसान लक्षात घेता अन्नधान्य, गळीतधान्य, तेलबिया इत्यादी पिकांसाठी केंद्र शासनामार्फत पुरस्कृत करण्यांत आलेली सर्वकष पिक विमा योजना ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्हयातील आंबा, काजू इत्यादी फळपिकांना लागू करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७९) '' राज्यातील शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(८०) '' कोकणातील भुभागापैकी सुमारे ५३.४५ टक्के पडित असलेल्या जमिनीत आंबा, काजू, सुपारी, कोकम, नारळ इ.फळांची लागवड आणि साग, शिसम, आईन, किंजळ, खैर इ.वृक्षांची वनराईची पध्दतशीर लागवड करण्याच्या दृष्टीने धडक कार्यक्रम हाती घेऊन या कार्यक्रमासाठी आर्थिक तरतूद व अन्य उपाययोजना करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(८१) '' नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ इत्यादी नैसर्गिक आपत्तीमुळे क्षतीग्रस्त झालेले शेतकरी पीक विमा नुकसान भरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे वंचित राहत असणे. याला शंभर वर्ष जुनी बिट्रीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करुन सुधारीत आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(८२) '' कोकण रेल्वे मार्गावरील प्रवाशांची वाढती संख्या विचारात घेता हा मार्ग दुपदरी (सेंकड ट्रॅक) करण्याची आवश्यकता, तसेच या रेल्वेमार्गावरील प्रत्येक रेल्वे स्थानकावर प्रवाशांच्या सोयीसाठी किमान पत्र्याची कायमस्वरुपी शेड उभारणे, सुलभ शौचालये व अन्य सुविधाअभावी प्रवाशांची विशेषत: महिला प्रवाशांची होत असलेली गैरसोय लक्षात घेता तेथे तातडीने शौचालये व अन्य अत्यावश्यक सोयीसुविधा उपलब्ध करण्याकरिता राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद राज्य शासनास करीत आहे.''

**श्री.जयंत पाटील यांचे ठराव क्रमांक ८३,८४,८५,८६ व ८७**

(८३) '' "कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वरकस जमिनी पाण्याखाली आणण्यासाठी तसेच मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येच्या अनुषंगाने त्याचप्रमाणे शहरीकरणाच्या विकासाच्या दृष्टीने पाण्याची निर्माण होत असलेली समस्या सोडविण्यासाठी कोयना धरणाचे विज निर्मितीनंतर वशिष्ठ नदीच्या (ता. चिपळूण, जि. रत्नागिरी) पात्रातून वाया जाणारे पाणी कोकणातील जिल्ह्यांना तसेच मुंबईसह ठाणे व नवी मुंबई या महानगरपालिकांच्या पाण्याची समस्या/दुष्काळ दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने चिपळूण तालुक्यातील वशिष्ठ नदीतील पाणी परशुराम घाटाच्या पायथ्यापासून उचलून (लिफ्टिंग) निसर्गाच्या गुरूत्वाकर्षणाच्या शक्तीने पूर्ण कोकण विभागाला पुरविण्याकरिता शासनाने एक खास कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरेने युध्दपातळीवर अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." ''

(८४) '' औरंगाबाद व नागपूर येथील मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाच्या धर्तीवर पुणे, सातारा, सांगली, सोलापूर व कोल्हापूर या जिल्ह्यातील जनतेच्या सोयीच्या दृष्टीने कोल्हापूर येथे मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाची निर्मिती करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(८५) '' राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्याच्या तुलनेत या राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्यायावत व योग्य पध्दतीने पूर्वतयारी करुन घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हयात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याचे दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(८६) '' राज्यातील पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देवून त्याठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व त्यायोगे तेथील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यासाठी तसेच यासर्व पर्यटन स्थळांचे महत्व कायम राखण्याच्यादृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(८७) '' राज्यातील शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.आनंद ठाकूर यांचे ठराव क्रमांक ८८,८९,९०,९१ व ९२**

(८८) '' मुंबईवर २६/११/२००८ रोजी पाकिस्तानी दहशतवाद्यांनी केलेला हल्ला, सुमारे ७२० कि.मी. लांबीचा लाभलेला सागरी किनारा, सुरक्षेच्या दृष्टिने अत्यंत महत्वाच्या जवळच

असलेल्या पालघर जिल्ह्यातील तारापूर अणुऊर्जा प्रकल्प, ओएनजीसीचा संभाव्य प्रकल्प, मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग, तारापूर औद्योगिक वसाहत, डहाणू थर्मल पॉवर प्रकल्प इत्यादी महत्वपूर्ण बाबी असणे, सातपाटी, उत्तन अर्नाळा येथे सागरी पोलीस स्टेशनमध्ये अपुरे कर्मचारी वर्ग अद्ययात यंत्रसामुग्रीचा अभाव, परिणामी जनतेत पसरलेले भितीचे व असुरक्षिततेचे वातावरण, जनतेच्या सुरक्षेच्या दृष्टिने एक अद्ययावत राष्ट्रीय सागरी पोलीस प्रशिक्षण केंद्र व्हावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(८९) '' पालघर जिल्ह्यातील विशेषतः डहाणू, बोईसर, वसई, नालासोपारा, विरार ही शहरे एका बाजूने डोंगर व दुसऱ्या बाजूने समुद्रखाडी यामध्ये वसलेली असून, शहरातील नागरिकरणाचा प्रचंड वेग लक्षात घेता मुलभूत सोईसुविधांवर पडत असलेला प्रचंड ताण, या शहरांचा विकास नियोजनबद्ध होण्यासाठी लागणारा कोट्यावधी रुपयांचा निधी, या परिसराला मुलभूत सुविधा मिळाव्यात व शहरांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडून जास्तीत जास्त निधी मिळण्याची नितांत आवश्यकता, विकासाच्या कामांची कालमर्यादा निश्चित करुन ही शहरे उच्च दर्जाची व्हावीत या दृष्टीने शासनाने योग्य ती पावले उचलावीत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९०) '' पालघर जिल्ह्यातील डहाणू, तलासरी, मोखाडा, जव्हार, वाडा, विक्रमगड ही सर्व गावे बारमाही वाहतुकीस योग्य व्हावीत, याकरिता या सर्व ग्रामीण भागातील रस्त्यांची पाहणी करुन रस्ते दुरूस्त करण्याची आवश्यकता, आवश्यक असेल तेथे नद्या, खाडया, नाले व मोऱ्यांवर पूल बांधून सर्व गावांच्या विकासासाठी तशा योजना आखून त्यांची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९१) '' पालघर जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील प्राथमिक, माध्यमिक तसेच आदिवासी आश्रम शाळांमधील शिक्षणाचा दिवसेंदिवस खालावत चाललेला दर्जा, अनेक शाळांमध्ये अपूरे शिक्षक वर्ग, माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना क्रिडांगणे, प्रयोग शाळा, संगणक, ग्रंथालय व इतर शैक्षणिक सोईसुविधा उपलब्ध करुन देण्याची नितांत आवश्यकता, या प्रकरणी अमुलाग्र सुधारणा करण्यासाठी एक कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९२) '' राज्यातील बहुसंख्य गावात विशेषतः उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणी टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी कमी करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**ॲड.राहुल नार्वेकर यांचे ठराव क्रमांक ९३,९४,९५ व ९६**

(९३) '' ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विद्यार्थी संख्या व शैक्षणिक कामांसाठी वारंवार मुंबईला मारावे लागणारे हेलपाटे तसेच त्या भागातील आदिवासी लोकसंख्या, डोंगराळ व दुर्गम भाग विचारात घेता कोकण प्रदेशासाठी एक स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९४) ''नामांकित कंपन्यांच्या औषधांच्या किंमती भरमसाठ असल्यामुळे ही महागाची औषधे खरेदी करुन उपचार करणे राज्यातील गोरगरीब सामान्य जनतेला परवडणारे नाही. त्यामुळे औषधांअभावी अनेक रुग्णांना मृत्यूला सामोरे जावे लागते, जेनेरिक औषधांचा गुणही नामांकित कंपन्यांच्या औषधांप्रमाणेच येतो, तसेच जेनेरिक औषधांच्या किंमतीही अतिशय कमी असतात व त्या गोरगरीब सामान्य जनतेला घेणे शक्य आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने राजस्थान राज्याप्रमाणेच जेनेरिक औषधे खरेदी करून नागरिकांना ती उपलब्ध करून द्यावीत, तसेच राज्यातील सर्व गावांमधून जेनेरिक औषधांची दुकाने सुरु करण्यास प्रोत्साहन द्यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९५) '' राज्यात विशेषत: ठाणे, रत्नागिरी, रायगड व सिंधुदूर्ग या जिल्ह्यांच्या किनारपट्टीवरील अनेक गावांच्या संरक्षणासाठी हजारो किलोमीटर लांबीचे बांधण्यात आलेले धूप प्रतिबंधक बंधारे दरवर्षी अनेक वेळा फुटल्यामुळे समुद्राचे खारे पाणी शेतजमिनीत शिरुन मालमत्तेचे, झाडांचे व शेतीचे सतत होणारे नुकसान, दिवसेंदिवस समुद्राच्या आक्रमणांची वाढती तीव्रता व परिणामी लोकांच्या मालमत्तेचे मोठया प्रमाणात होत असलेले नुकसान लक्षात घेता समुद्राच्या वाढत्या अतिक्रमणाचा गंभीर स्वरुपाचा धोका निर्माण होऊ नये यासाठी शासनाने या चारही जिल्ह्यांच्या गावांच्या संरक्षणासाठी नियोजनबध्द व कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९६) '' कोकणातील आंबा,काजू इ.पिकांचे नैसर्गिक आपत्तीमुळे फार मोठया प्रमाणात होणारे नुकसान लक्षात घेता अन्नधान्य, गळीतधान्य, तेलबिया इत्यादी पिकांसाठी केंद्र शासनामार्फत पुरस्कृत करण्यांत आलेली सर्वकष पिक विमा योजना ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्हयातील आंबा, काजू, कोकम तसेच भातशेती इत्यादी फळपिकांना लागू करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.रामनाथ मोते यांचे ठराव क्रमांक ९८,९९ व १००**

(९८) '' राज्यातील सर्व धर्मादाय शैक्षणिक संस्थांचे प्रशासन होण्यासाठी व नियोजन होणे आवश्यक आहे म्हणून सदर संस्थांचा कारभार पहाण्यासाठी स्वतंत्र शैक्षणिक धर्मादाय आयुक्तालयाची निर्मिती करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(९९) '' राज्यातील सर्व न्यायालयांचे कामकाज १०० टक्के मराठी भाषेतून होण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१००) '' औरंगाबाद व नागपूर येथील मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाच्या धर्तीवर पुणे, सातारा, सांगली, सोलापूर व कोल्हापूर या जिल्ह्यातील जनतेच्या सोयीच्या दृष्टीने कोल्हापूर येथे मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाची निर्मिती करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.संजय दत्त यांचे ठराव क्रमांक १०१,१०२,१०३,१०४ व १०५**

(१०१) '' मुंबई शहरामध्ये अत्यंत मोक्याच्या जागेवर असलेल्या अनेक खाजगी मिल मालकांच्या तसेच राष्ट्रीयकृत कापड गिरण्या बंद पडल्यानंतर गिरण्या ज्याठिकाणी होत्या, त्याठिकाणी गगनचुंबी, इमारती, मॉल खाजगी कंपन्यांच्या इमारती बांधकामास सुरुवात झाली, परंतु सदर जुन्या गिरण्यांमध्ये काम करणाऱ्या कामगार व त्यांच्या कुटुंबियांना मात्र गिरण्यांच्या जागी उभ्या राहणाऱ्या इमारतींमध्ये राहण्याच्या जागा दिल्या नाहीत. तसेच मॉल, कार्यालय यामध्ये नोक-यासुध्दा दिलेल्या नाहीत, गिरणीच्या जमिनीपैकी विहित हिस्सा महापालिका, म्हाडा यांना द्यावयाचा आहे. परंतु अनेक मालकांनी जमिनी म्हाडा व महापालिकेस दिलेल्या नाहीत. ६७,००० घरे गिरणी कामगारांकरीता बांधणार असे आश्वासन शासनाकडून देण्यात आलेले आहे. तथापि बांधलेली ६,९०० घरे गिरणी कामगारांना केव्हा वितरीत करण्यात येणार आणि राहिलेली ६०,००० घरे केव्हा बांधणार याबद्दल शासनाकडून कोणताही खुलासा नाही. तसेच गिरण्यांच्या चाळीत राहणाऱ्या कामगारांना ३०० चौ.फूटाच्या खोल्या देखील मिळाल्या नाहीत. गेल्या १० वर्षात अनेक कामगार मृत झाले. वर्षानुवर्ष गिरण्यांमध्ये काम केलेल्या कामगारांना गिरण्यांच्या जागेवर घरे देण्याची मागणी शासनाकडे तसेच म्हाडाकडे अनेक वर्षापासून केली जात आहे. म्हणून मुंबईतील गिरणी कामगारांना घरे देण्याच्या दृष्टिने शासनाने विहित मर्यादेचा (टाईम बॉंड) कार्यक्रम आखून त्यांची ठोस अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(१०२) '' राज्यात राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठया प्रमाणात होत असलेले अपघात, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालये नसणे, या अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी राज्यमार्ग, राष्ट्रीय महामार्ग येथे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून लहान-लहान उपचार केंद्रे सुरु झाल्यास येथे वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचारी नेमणूक केली गेली तर सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळून राज्यातील बेरोजगारी दूर होण्यास मदत होईल तसेच अपघातग्रस्तांना वेळीच उपचार होतील. म्हणून राज्यमार्ग व राष्ट्रीय महामार्गावर ५० कि.मी. अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र उघडण्यात यावे, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. ''

(१०३) '' राज्यातील पोलिसांना २४ तासाहून अधिक तास काम करावे लागत असल्यामुळे त्यांच्यावर दिवसेंदिवस कामाचा ताण वाढत आहे. तसेच पुरेशी शासकीय निवासस्थाने उपलब्ध नसल्यामुळे, अनेक पोलिसांना भाडयाच्याच घरात राहावे लागत आहे. शासनाकडून देण्यात आलेल्या शासकीय निवासाची अत्यंत दुरावस्था आहे, कामाचा ताण, गृहनिर्माणाचा प्रश्न, यामुळे त्यांच्यात निर्माण होत असलेले तणावाचे वातावरण, परिणामी त्यांच्यावर मानसिक ताण वाढत असून त्यांच्यात आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. म्हणून पोलिसांच्या कार्यक्षमतेचा सर्वंकष विचार होऊन त्यांच्या कामाचे तास, एक साप्ताहिक सुटी, निवासस्थाने इत्यादी मुलभूत समस्यांबाबत कायमस्वरुपी तोडगा काढण्याच्यादृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१०४) '' राज्यातील धार्मिक स्थळांच्या व तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांची होणारी अफाट गर्दी, परंतु धार्मिक स्थळी व तिर्थक्षेत्राकडे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना स्थानिक

प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य प्राथमिक सोयी सुविधाही उपलब्ध करुन दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्या वेळी चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांना मृत्यू येणे, यामध्ये अनेक जण गंभीर जखमी होणे, त्यामुळे राज्यातील धार्मिक स्थळांच्या, तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी शासनाने योग्य सुविधांचे नियोजन करण्याच्या दृष्टीने तशा योजना आखाव्यात व त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनाला करीत आहे ''

(१०५) '' मराठी भाषेसाठी राज्य शासनाने स्थापन केलेल्या स्वतंत्र विभागासाठी १० कोटी रुपयांची तरतूद करुन स्वतंत्र सचिवांची नियुक्ती करण्याचा व त्यांच्या कक्षेत भाषा संचालनालय व इतर कार्यालये देण्याचा घेतलेला निर्णय, तरी राज्यातील ग्रामपंचायत स्तरापासून मंत्रालय स्तरापर्यंत आणि ग्रामपंचायत सदस्यांपासून मुख्यमंत्र्यांपर्यंत सर्व शासकीय निमशासकीय कार्यालयात तसेच राज्याच्या एकंदरीत सर्वच व्यवहारामध्ये मराठीचा १०० टक्के वापर होण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करणे, तसेच, कामकाजात मराठी भाषेचा वापर करण्यास टाळाटाळ करणाऱ्या अथवा त्यात कसूर करण्याऱ्या अधिकाऱ्यांना जबाबदार धरुन त्यांच्यावर कडक कारवाई करण्याची जबाबदारी देखील राज्य शासनाने मराठी भाषा विभागाकडे सोपविण्याचा निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

**श्री.धनंजय मुंडे यांचे ठराव क्रमांक १०६,१०७,१०८ व १०९**

(१०६) '' नामाकिंत कंपन्यांच्या औषधाच्या किंमती भरमसाठ असल्यामुळे ही महागाची औषधे खरेदी करुन उपचार करणे, राज्यातील गोरगरीब सामान्य जनतेला परवडणारे नाही. त्यामुळे औषधांअभावी अनेक रुग्णांना मृत्यूला सामोरे जावे लागते, जेनेरिक औषधांचा गुणही नामांकित कंपन्यांच्या औषधांप्रमाणेच येतो, तसेच जेनेरिक औषधांच्या किंमतीही अतिशय कमी असतात व त्या गोरगरीब सामान्य जनतेला घेणे शक्य आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने राजस्थान राज्याप्रमाणेच जेनेरिक औषधे खरेदी करून नागरिकांना ती उपलब्ध करून द्यावीत, तसेच राज्यातील सर्व गावांमधून जेनेरिक औषधांची दुकाने सुरु करण्यास प्रोत्साहन द्यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१०७) '' राज्यातील ऊसतोड कामगार ऊस तोडणीसाठी वर्षातील ८ महिने घराबाहेर राहत असल्यामुळे व त्यांच्या सोबत त्यांचे संपूर्ण कुटूंबही ऊस तोडणीसाठी स्थंलातरित होत असल्यामुळे त्यांच्या मुलांना शिक्षणापासून वंचित रहावे लागत आहे, या ऊसतोड कामगारांच्या मुलांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी राज्यातील प्रत्येक तालुक्यात ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी निवासी शाळा सुरू कराव्यात, ऊसतोडणी कामगारांच्या महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या मुलांसाठी शासकीय वस्तीगृहांमधून निवासाची व भोजनाची व्यवस्था करावी, तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या धर्तीवर ऊसतोडणी कामगारांच्या मुलांना शाळा, महाविद्यालयांमार्फत शिष्यवृत्ती व शुल्क सवलत देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१०८) '' राज्यातील स्त्री-भ्रूण हत्यांचे प्रमाण वाढत असल्यामुळे भविष्यात सामाजिक दरी निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. स्त्री भ्रूण हत्यांचे प्रमाण रोखण्यासाठी आणि मुला-मुलींचा जन्मदर समान पातळीवर रहावा, यासाठी शासनाने स्त्री-भ्रूण हत्या विरोधी कायदा अधिक कडक करून स्त्री-भ्रूण हत्या करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१०९) ''राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण, नोकरी व रोजगाराअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य, शासनाने बंद केलेला सुशिक्षित बेरोजगार भत्ता, रोजगाराच्या भाग भांडवलासाठी बँकासारख्या आर्थिक संस्थाकडून येणाऱ्या अडचणी, या बाबी विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी व गरीब कुटूंबातील व्यक्तीला रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, सुशिक्षित बेरोजगारांना पुन्हा भत्ता सुरू करावा, रोजगारासाठी भागभांडवलाची सोय करावी व बंदी घालण्यात आलेली नोकर भरती पुन्हा सुरू करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**डॉ.नीलम गोऱ्हे यांचे ठराव क्रमांक १११ व ११२**

(१११) '' महाराष्ट्रात व भारतात महिलांना ५० टक्के आरक्षण देण्यात आले आहे. १९९४ पासून प्रत्येक पाच वर्षानी साधारण १ लाख ४०००० महिलांना (३३ टक्के) नुसार आरक्षणाचा लाभ मिळाला. आता या स्त्रियांची संख्या वाढणार आहे. या निर्वाचित स्त्रियांच्या प्रशिक्षणासाठी विधानसभा अध्यक्ष व विधानपरिषद सभापती, गटनेते तथा सर्व महिला (सभा-परिषदेतील) सदस्यांच्या सहभागाने महिला निर्वाचित प्रतिनिधीच्या प्रशिक्षणाचा तपशील ठरवून कायमस्वरुपी व्यापक प्रशिक्षणाची यंत्रणा उभारणे व त्यावर सहाकार्य, मार्गदर्शन करणे व देखरेख करणे यासाठी तीन वर्षाच्या कालावधीसाठी समिती करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(११२) '' मस्कुलिनिटी इंटिमेट पार्टनर व्हायोलन्स अँड सन प्रेफरन्स इन इंडिया आणि इंटरनॅशनल सेंटर फॉर रिसर्च ऑन वुमन या संस्थेनी भारतातील ७ राज्यात केलेल्या पाहणीमध्ये महाराष्ट्रात महिलांवर अत्याचाराचे प्रमाण ३७ टक्के असल्याचे आढळून येणे, सदर अत्याचारांमध्ये शारिरिक, भावनिक, अपमान, भिती, धमकी, इत्यादिंचा समावेश असणे, सदर अत्याचाराचे प्रमाण दिवसेंदिवस राज्यात वाढत जाणे, भिती व लाजेपोटी या अत्याचाराविरुद्ध पोलिसांत तक्रारी करण्यासाठी महिला पुढे न येणे, कौटुंबिक हिंसाचाराविरोधी कायद्याची राज्यात प्रभावी अंमलबजावणी न होणे, सदर प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी व शिफारशी करण्यासाठी दोन्ही सभागृहाच्या पुरुष व महिला विधीमंडळ सदस्यांची संयुक्त समिती नियुक्त करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे ''

**अ‍ॅड.जयदेव गायकवाड यांचे ठराव क्रमांक ११८,११९,१२०,१२१ व १२२**

(११८) '' राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवास करुन अध्ययनाचे काम करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारिरिक व

बौध्दिक विकास खुंटत असल्याने ह्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा" अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(११९) '' शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा वा महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत दिली जाते त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील पाल्यांना शाळा व महाविद्यालयांमार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत देण्यांत यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१२०) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे व पदवीधरांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधीत प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१२१) '' राज्यातील दूरदर्शन तसेच केबल नेटवर्कद्वारा प्रसारित होणाऱ्या विविध चॅनेलद्वारा अश्लील व हिंसाचारी चित्रपट, जाहिराती व विविध विषयांवरील मालिका सर्रासपणे प्रसारित केल्या जातात, परिणामी तरुणपिढीवर व बालमनावर त्यांचे होणारे दुष्परिणाम व वाढते लैंगिक गुन्हे लक्षात घेता या सर्व वाहिन्यांवरील अश्लील कार्यक्रमांवर बंदी घालावी यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तात्काळ पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(१२२) '' पुणे, पिंपरी-चिंचवड व पुणे ग्रामीण भागाचे वेगाने होणारे शहरीकरण, त्या मानाने या भागात रस्त्यांचा विकास न झाल्याने वाहतुकीची होत असलेली प्रचंड कोंडी, सुलभ व जलद वाहतुकीसाठी तेथे सोईसुविधांचा असलेला अभाव, या परिस्थितीवर तोडगा निघावा यासाठी पुणे-पिंपरी- चिंचवड व पुणे शहराच्या आसपासच्या भागाच्या विकासासाठी मुंबई प्रदेश विकास प्राधिकरणाच्या धर्तीवर पुणे विकास प्राधिकरण नेमून त्याकरिता शासनाने मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

**डॉ.सुधीर तांबे यांचे ठराव क्रमांक १२३,१२४ व १२५**

(१२३) '' राज्यात पूर्व प्राथमिक शिक्षणासाठी सुमारे १ लाख अंगणवाडया आहेत. संख्या समाधानकारक जरी असली तरी या अंगणवाडयाद्वारे दर्जेदार पूर्व प्राथमिक शिक्षण मिळत नाही. वैद्यकीय शास्त्रानुसार लहान मुलांच्या मेंदूची ९० टक्के वाढ ही ६ वर्षापर्यंत होत असते. शैक्षणिक आवड निर्माण होणे, ज्ञानेद्रियांचा योग्य विकास होणे, तसेच बौध्दिक विकास या सर्व दृष्टीने हा कालावधी अत्यंत महत्वाचा आहे. यासाठी पूर्व प्राथमिक शाळेत दर्जेदार शिक्षण देण्यासाठी तज्ञांची समिती गठीत करून विशेष कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१२४) '' राज्यातील पोलिसांना २४ तासाहून अधिक तास काम करावे लागत असल्यामुळे त्यांच्यावर दिवसेंदिवस कामाचा ताण वाढत आहे. तसेच पुरेशी शासकीय निवासस्थाने उपलब्ध नसल्यामुळे, अनेक पोलिसांना भाडयाच्याच घरात राहावे लागत आहे. शासनाकडून देण्यात आलेल्या शासकीय निवासाची अत्यंत दुरावस्था आहे, कामाचा ताण, गृहनिर्माणाचा प्रश्न, यामुळे त्यांच्यात निर्माण होत असलेले तणावाचे वातावरण, परिणामी त्यांच्यावर मानसिक ताण वाढत असून त्यांच्यात आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. म्हणून पोलिसांच्या कार्यक्षमतेचा सर्वंकष विचार होऊन त्यांच्या कामाचे तास, एक साप्ताहिक सुटी, निवासस्थाने इत्यादी मुलभूत समस्यांबाबत कायमस्वरुपी तोंडगा काढण्याच्यादृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१२५) '' राज्यातील शेतकऱ्यांवर नेहमीच दुष्काळाची छाया पसरलेली असते. कधी ओला दुष्काळ तर कधी सुका दुष्काळ ही परिस्थिती शेतकऱ्यांवर नेहमीच येत असते. यामुळे अनेक शेतकरी कर्जबाजारी होतात व यातून त्यांच्या आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. सध्या गोवा सरकारने शेतकऱ्यांना पेन्शन योजना सुरु केल्या आहेत त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासनानेही राज्यातील दारिद्रय रेषेखालील शेतकऱ्यांना पेन्शन योजना सुरु करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्रीमती हुस्नबानू खलिफे यांचे ठराव क्रमांक १२६,१२७,१२८ व १२९**

(१२६) '' शासनाच्या औद्योगिक धोरणानुसार कोकण विभागात औद्योगिक वसाहतीच्या माध्यमातून विकास करण्यास तेथील स्थानिकांचा विरोध नसणे, तथापि कोकण विभागात यापूर्वी वसविलेल्या औद्योगिक वसाहतीमध्ये वाटप करण्यात आलेल्या परंतु तेथे उद्योग सुरु न केल्याने तेथील जमिनी ओस पडत असताना दुसऱ्या औद्योगिक वसाहती निर्माण करण्याच्या शासनाच्या निर्णयामुळे तेथील स्थानिक शेतकऱ्यांचा विरोध होत असणे, औद्यागिक वसाहतीला कोकण विभागात शेतकऱ्यांचा व नागरिकांचा वाढता विरोध पहाता विनावापर राहिलेल्या जमिनी परत घेऊन त्यांचा योग्य उपयोग करण्याच्या दृष्टीने शासनाने नियोजनबद्ध व कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करण्यासाठी खास उपाययोजना करावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करित आहे. ''

(१२७) '' "कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील वरकस जमिनी पाण्याखाली आणण्यासाठी तसेच मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येच्या अनुषंगाने त्याचप्रमाणे शहरीकरणाच्या विकासाच्या दृष्टीने पाण्याची निर्माण होत असलेली समस्या सोडविण्यासाठी कोयना धरणाचे विजनिर्मितीनंतर वशिष्ठ नदीच्या (ता. चिपळूण, जि. रत्नागिरी) पात्रातून वाया जाणारे पाणी कोकणातील जिल्ह्यांना तसेच मुंबईसह ठाणे व नवी मुंबई या महानगरपालिकांच्या पाण्याची समस्या/दुष्काळ दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने चिपळूण तालुक्यातील वशिष्ठ नदीतील पाणी परशुराम घाटाच्या पायथ्यापासून उचलून (लिफ्टिंग) निसर्गाच्या गुरत्वाकर्षणाच्या शक्तीने पूर्ण कोकण विभागाला पुरविण्याकरिता शासनाने एक खास कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरेने युध्दपातळीवर अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." ''

(१२८) '' राज्यातील पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी व रत्नागिरी जिल्ह्यातील तालुक्याना (राजापूर, गणपतीपुळे, गुहागर, चिपळूण, दापोली) पर्यटन म्हणून शासन मान्यता मिळण्याबाबत या करीता त्याठिकाणी मार्गदर्शन नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देऊन तेथील सुशिक्षित बेरोजगारांना पर्यटकाच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करण्यासाठी सर्व पर्यटकांचे महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१२९) '' कोकण किनारपट्टीवरील विशेषत: रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील राजापूर-नाटे, गुहागर, वरवडे, दाभोळ-धोपावे, मालवण, वेंगुर्ला येथील जेट्टी नादुरुस्त असणे तसेच त्यांची उंची कमी असल्याने, समुद्राचे पाणी मोठ्या प्रमाणात शिरुन मच्छिमार बांधवांचे नुकसान होत असणे, बंदारावरील गाळांचे प्रमाण वाढणे, परिणामी मच्छिमार कोळी बांधवांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, या बंदराची देखभाल व दुरुस्ती करुन तसेच गुहागर, वेळणेश्वर, आजगोली, गणपतीपुळे येथे नवीन बंदराची निर्मिती करुन त्यांचा विकास करण्याच्या दृष्टीने शासनाने नियोजनबद्ध व कालबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करण्याबाबत राज्यशासनाने खास उपाययोजना करावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्रीमती दिप्ती चवधरी यांचे ठराव क्रमांक १३०,१३१,१३२,१३३ व १३४**

(१३०) '' दारिद्रय रेषेखालील कुटूंबाची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटूंबाचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्रयरेषेखाली असणाऱ्या कुटूंबाना पिवळ्या रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागणे, शासनाच्यावतीने रुपये १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे ५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल जनतेला दारिद्रयरेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१३१) '' राज्यात वाढत चाललेली सुशिक्षित बेरोजगारांची संख्या, सेवायोजन कार्यालयात नाव नोंदणी करुन सुमारे १० ते १५ वर्षांच्या कालावधीनंतरही नोकरी न मिळणे, राज्यात स्वयंरोजगार योजना सुरू होऊन सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार उपलब्ध न होणे, परिणामी त्यांच्यात वाढत असलेली वैफल्याची भावना व तीव्र असंतोष लक्षात घेता सुशिक्षित बेरोजगारांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी, स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी तसेच नोकरी मिळण्यासाठी सेवायोजन कार्यालयातील कामकाज पध्दतीत सुधारणा करण्याच्या दृष्टीने शासनाने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१३२) '' राज्यातील जीवनावश्यक वस्तुंच्या बेसुमार वाढत असलेल्या किंमती, त्यावर नियंत्रण ठेवण्यात शासनाला आलेले अपयश, ऐन सणासुदीच्या वेळी बाजारात जीवनावश्यक वस्तुंचा कृत्रिम तुटवडा निर्माण करुन त्या वस्तुंची बेसुमार भाववाढ करण्याची व्यापारी वर्गात निर्माण झालेली प्रवृत्ती, सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानात जीवनावश्यक वस्तुंचा निर्माण झालेला तुटवडा, त्यामुळे जनतेवर पडत असलेला आर्थिक ताण, या सर्व गोष्टींचा सर्वकष विचार करुन जीवनावश्यक वस्तुंचे योग्य व स्वस्त दराने वितरण करण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था

अधिक बळकट करुन स्थिर भाव योजना आखावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१३३) '' राज्यातील ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींना देखभालीसाठी हस्तांतरीत करण्यात आलेल्या नळ पाणीपुरवठा योजना निधी अभावी बंद पडतात, व्यवस्थापन नीट होत नाही, त्यामुळे देखभाल व व्यवस्थापन सुरळीत होण्यासाठी शासनाने या सर्व नळपाणी पुरवठा योजना स्वतंत्र महामंडळाकडे सोपवाव्यात अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१३४) '' राज्यात महिला व तरुण मुलींवर होणारे अत्याचार व त्यांचे होणारे मृत्यू विचारात घेता महिलांवरील अत्याचाराबाबतचे खटले विनाविलंब निकालात काढण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी स्वतंत्र न्यायालये स्थापन करण्यांत यावीत, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.राजेंद्र मुळक यांचे ठराव क्रमांक १३५,१३६ व १३७**

(१३५) '' राज्यातील वेगवेगळया प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ.बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबध्द धडक कार्यक्रम राबविण्यात यावा,अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१३६) '' राज्यातील शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१३७) '' विदर्भात सिंचनाच्या अपुऱ्या सोयी असल्यामुळे या भागातील शेतकऱ्यांना वर्षानुवर्षे नापिकी आणि नुकसान सहन करावी लागत असून अनेक सिंचन विषयक योजना/पाटबंधारे प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्यामुळे शेतकऱ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन विदर्भात सिंचनविषयक प्रगती होण्याचे दृष्टीने मोठया प्रमाणावर सिंचनाच्या सोयी उपलब्ध करण्यात याव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप यांचे ठराव क्रमांक १३९,१४० व १४१**

(१३९) '' राज्यात उद्योग जगतात मोठ्या प्रमाणावर स्थानिक भूमीपूत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपूत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयामध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपूत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील बेरोजगार भूमीपूत्रांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी

यापुढे राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनांवरील कार्यालयांमध्ये नोकरी देताना भूमीपूत्रांना प्राधान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१४०) '' राज्यातील विनाअनुदान तत्वावर मान्यता देऊन सुरु करण्यात आलेल्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोग शाळा, ग्रंथालये इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विना अनुदान तत्त्वावर मान्यता दिलेल्या राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१४१) '' राज्यात महिला व तरुण मुलींवर होणारे अत्याचार व त्यांचे होणारे मृत्यू विचारात घेता महिलांवरील अत्याचाराबाबतचे खटले विनाविलंब निकालात काढण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी स्वतंत्र न्यायालये स्थापन करण्यांत यावीत, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.अमरसिंह पंडित यांचे ठराव क्रमांक १४२,१४३,१४४,१४५ व १४६**

(१४२) '' राज्यात विशेषतः मराठवाडयात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट समस्या लक्षात घेता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीपणे सोडविण्यासाठी धरण, तलाव आदी जलसाठयांतील पाण्याच्या उपलब्धतेचे व वापराचे नियोजन करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१४३) '' मराठवाड्याच्या विकासाच्या दृष्टीने आवश्यक असलेले अहमदनगर-बीड-परळी, सोलापूर-बीड-जळगाव या नविन रेल्वे मार्गाचे काम सत्वर हाती घेण्यासाठी कोकण रेल्वे महामंडळाच्या धर्तीवर एक स्वायत्त रेल्वे महामंडळ स्थापन करुन हे रेल्वे मार्ग विहित मुदतीत पूर्ण करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. ''

(१४४) '' सामुहिक विवाह सोहळ्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून अशा सामुहिक विवाह सोहळ्यात विवाह करणाऱ्या दाम्पत्यांना आर्थिक सहाय्य तसेच असे सोहळे आयोजित करणाऱ्या सेवाभावी संस्थांना अनुदान देण्याची योजना शासनाने त्वरित आखावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१४५) '' शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना माध्यमिक व उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती व शुल्क सवलत दिली जाते यासाठी शासन संबंधित शाळा व महाविद्यालयांना आर्थिक अनुदान देणे, त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील पाल्यांना शाळा व महाविद्यालयांमार्फत शिष्यवृत्ती आणि शुल्क सवलत देण्यांत यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१४६) '' राज्यातील विशेषतः मराठवाडयातील सर्व गावे बारमाही वाहतूकीस योग्य व्हावीत तेथे नद्या, नाले व मोऱ्या यांच्यावरील पुलांची बांधकामे दुरूस्ती करून ग्रामीण भागातील रस्ते वाहतुकीस योग्य करण्यासाठी धडक योजना शासनाने हाती घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**एकवीस** : सर्वसाधारण सार्वजनिक हितसंबंधाच्या बाबी.

**बावीस** : सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली कागदपत्रे (यादी स्वंतत्रपणे वितरीत करण्यात आली आहे.)

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ०९ मार्च, २०१५.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव
महाराष्ट्र विधानपरिषद.